महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १३७ वे | दिनांक : १२/०५/२०२६ | वार : मंगळवार

## महिलांचे लैंगिक शोषण आणि मानसिक छळ : राष्ट्रीय महिला आयोगाचा धक्कादायक अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर

**नाशिक :** येथील TCS बीपीओ युनिटमधील महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण आणि जबरदस्तीने धर्मांतर केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणाने आता मोठे वळण घेतले आहे. या गंभीर घटनेची दखल घेत राष्ट्रीय महिला आयोगाने सखोल चौकशीअंती ५० पानांहून अधिकचा धक्कादायक अहवाल प्रसिद्ध केला असून, तो पुढील कार्यवाहीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर करण्यात आला आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या या अहवालात कार्यस्थळावरील लैंगिक छळ, मानसिक अत्याचार आणि धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचे गंभीर ताशेरे ओढण्यात आले असून, 'पॉश' कायद्याची अंमलबजावणी शून्य असल्याचे सांगितले आहे. आरोपींनी महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक, मानसिक आणि भावनिक शोषण केल्याचा स्पष्ट निष्कर्ष आयोगाने काढला आहे. इतकेच नव्हे तर, हिंदू धर्म, परंपरा आणि श्रद्धांचा अपमान करून महिलांवर विशिष्ट दबाव टाकल्याचा धक्कादायक आरोपही या अहवालाद्वारे करण्यात आला आहे.

या अहवालात नमूद केल्यानुसार, महिला कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण असून तक्रार केल्यास बदली किंवा नोकरी गमावण्याची धमकी दिली जात होती. विशेष म्हणजे, 'पॉश' समिती पूर्णपणे निष्क्रिय असून कार्यालयातील सीसीटीव्ही कॅमेरेही बंद अवस्थेत असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत राष्ट्रीय महिला आयोगाने पोलिसांना 'विटनेस प्रोटेक्शन ॲक्ट' अंतर्गत तक्रारदारांना संरक्षण देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, संबंधित आरोपींवर बीएनएस कलम ७५, ७८, ७९ आणि २९९ अंतर्गत कठोर कारवाई करण्याची शिफारस करतानाच, महिलांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष केल्याप्रकरणी टीसीएस व्यवस्थापनावरही ताशेरे ओढले आहेत.

नाशिकमधील TCS मध्ये महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक शोषणाचे आणि मानसिक छळाचे अत्यंत गंभीर प्रकरण समोर आले असून, याप्रकरणी आतापर्यंत ८ पीडित महिलांनी तक्रार दाखल केली आहे. या तक्रारींच्या आधारे पोलिसांनी एकूण ९ एफआयआर नोंदवल्या आहेत. यामध्ये कंपनीतील वरिष्ठ कर्मचारी, एचआर विभागाचे अधिकारी आणि डिलिव्हरी पार्टनर यांचा समावेश असून, त्यांच्यावर बळजबरी, लैंगिक शोषण, लग्नाचे आमिष दाखवून फसवणूक आणि धार्मिक भावना दुखावणे यांसारखे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणात आतापर्यंत दोन महिलांसह एकूण ८ जणांना अटक करण्यात आली आहे.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन TCS प्रशासनाने अटक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे तात्काळ निलंबन केले आहे. कंपनीने एका निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे की, ते या संपूर्ण तपासात पोलिसांना पूर्ण सहकार्य करत आहेत. दुसरीकडे, डिलिव्हरी पार्टनर असलेल्या आरोपी महिलेच्या वकिलांनी मात्र हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. या प्रकरणातील आरोपांचे स्वरूप पाहता नाशिकमध्ये मोठी खळबळ उडाली असून, पीडित महिलांना न्याय मिळावा यासाठी विविध स्तरातून मागणी होत आहे.

## सरकारला कामगारांची मेहनत नव्हे फक्त उद्योगपती मित्रांचे फायदे दिसतात - विजय वडेट्टीवार



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात कामगारांची अवस्था बिकट झाली आहे. सध्या देशातील जवळपास २५ टक्के कामगारांना किमान वेतनही मिळत नाही. देश चालवणाऱ्यांना कामगारांची मेहनत दिसत नाही, फक्त उद्योगपती मित्रांचे फायदे दिसतात, अशी टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सोमवारी केंद्र सरकारवर निशाणा साधताना केली.

एसबीआयचा पीएलएफएस २०२५ अहवाल नुकताच जारी झाला. विजय वडेट्टीवार यांनी या अहवालाचा दाखला देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारवर उपरोक्त शब्दांत निशाणा साधला. ते म्हणाले, सबका साथ, सबका विकास म्हणणाऱ्या मोदी सरकारच्या काळात कामगारांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया च्या PLFS २०२५ अहवालानुसार देशातील जवळपास २५% कंत्राटी कामगारांना किमान वेतनही मिळत नाही. महिलांची अवस्था तर आणखी वाईट आहे. देश चालवणाऱ्यांना मात्र कामगारांची मेहनत दिसत नाहीत, फक्त उद्योगपती मित्रांचे फायदे दिसतात.

नवीन Labour Codes च्या नावाखाली भाजप सरकारने कामगारांचे हक्कच कमजोर केले आहेत. संप करायचा असेल तर ६० दिवस आधी नोटीस द्या, तक्रार प्रलंबित असेल तर संप बेकायदेशीर ठरेल, सुरक्षा नियम मोडले तरी पैसे भरून सुटका मिळेल. म्हणजे कामगारांनी फक्त काम करत राहायचं, प्रश्न विचारायचे नाहीत, हक्क मागायचे नाहीत. Ease of Doing Businessच्या नावाखाली Hardship of Living सामान्य जनतेच्या माथी मारलं जात आहे.

भाजपची अर्थनीती आता स्पष्ट दिसते आहे. गरीबांची मेहनत स्वस्त करा, कामगारांचा आवाज दाबा आणि उद्योगपती मित्रांसाठी रेड कार्पेट अंथरा. पण लक्षात ठेवा, मजुरांच्या हाडांवर उभे केलेले महाल जास्त काळ टिकत नाहीत, असे ते म्हणाले.

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी पंतप्रधानांनी जनतेला केलेल्या काटकसरीच्या आवाहनाचाही खरपूस समाचार घेतला. तसेच २००८ च्या भयंकर जागतिक महामंदीचा काँग्रेसच्या कुशल नेतृत्वामुळे देशाला कोणताही फटका बसला नसल्याचाही दावा केला. ते म्हणाले, २००८ च्या महाभयंकर जागतिक मंदीतही ज्या देशाचं सुकाणू हललं नाही, मंदीचे चटके बसत असतानाही आपला देश सुरक्षित राहिला. तिथे आज महासत्तेच्या नावाखाली जनतेलाच त्याग करायला सांगितलं जातंय! २०१४ मध्ये अच्छे दिनचे स्वप्न दाखवून सत्तेत आलेले आज सांगतात पेट्रोल, डिझेल वापरू नका, सोनं घेऊ नका, खाद्यतेल कमी करा!

साहेब, देशाला बर्बाद करायचं कार्यक्रम तुम्ही करायचा आणि जबाबदारी मात्र जनतेने घ्यायची? पाच राज्यांच्या निवडणुका होईपर्यंत युद्धाचा विसर पडला होता, आता निवडणुका संपल्या की लगेच 'त्याग' आठवला? सल्ले द्यायला फक्त पंतप्रधान, आणि भोगायला मात्र सामान्य जनता! वाह मोदीजी वाह, असे ते म्हणालेत.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १२ मे २०२६


## डॉ. जाकिर हुसैन ऊर्दू हाई स्कूलचा दहावीचा निकाल १००% निकलात मुलीच अव्वल




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील डॉ ज़ाकिर हुसैन एजुकेशन सोसायटी संचलित डॉ ज़ाकिर हुसैन उर्दू हाई स्कूल एकूण निकाल शंभर टक्के लागला आहे. गेल्या आठ वर्षांपासूनची निकालाची परंपरा कायम राखली आहे.लोनी सदफ महरीन महबूब या विद्यार्थिनीने ८०.०० टक्के गुण मिळवत विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. ढोबळे तनसिफा तनवीर या विद्यार्थिनींनी ७९.६० टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तर डबीर तंजिला खालिद व बांगी मदीहा खुन्मीर या विद्यार्थिनीने ७८.६० टक्के समान गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावले आहे. विद्यालयाचे ६ विद्यार्थी ९० पेक्षा जास्त तर १० विद्यार्थी ८० गुण मिळवत गणित विषयात उत्तीर्ण झाले आहेत. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन कले आहे. शहर व परिसरातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

## भारत करीयर अकॅडमीला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले




**दौलताबाद (जावेद अहमद) :** मातोश्री समृद्धी प्रतिष्ठान व जे बी शेट संचिलत संस्थेच्या वतीने राजकीय, सामाजिक, महिला सबलीकरण, शैक्षणिक अश्या अनेक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या लोकांना अकरा वर्षापासून पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे रविवारी मौलाना आझाद रिसर्च सेंटर येथे माजी न्यायधीश दर्शनसिंग बेदी व सिटी चौक पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आलेयावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जयराम भोईर,मकसूद अन्सारी, सलीम चिस्ती,हाफिज अली, शकील शेख,पत्रकार जावेद शेख,मुख्य संपादक हसन अली, हनिफ शेख आदींची उपस्थिती होतीभारत कॅरीअर एकेडमी पडेगाव छत्रपती संभाजीनगर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले संचालक अमोल कवडे, बाळासाहेब घुगे , समाधान सुरडकर हे तीन माजी सैनिक असून देशातील विविध ठिकाणी देशसेवा केली आहेतिन्ही मित्र कारगिल योद्धे आहे देशसेवा पूर्ण केल्यानंतर आपल्या ला आपल्या सारखेच असे सैनिक घडवून दयायचे असे ठरवून पडेगाव येथे 2019पासून भारत करीअर नावाने एकेडमी सुरू केली आहे यात पोलीस भरती, आर्मी, नेव्ही,एअर फोर्स, वनरक्षक, महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी MPSC इत्यादी भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र सुरू NDA प्रशिक्षण देण्यात येते त्यात पोलीस, सैनीक आर्मी, नेव्ही, एअर फोर्स ,महसूल अधिकारी, पंचायत अधिकारी, वनरक्षक अश्या अनेक पदावर जवळपास दोन हजार तरुण तरुणीं विद्यार्थ्यां उतीर्ण झाले आहे.

स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी यांनी मदत केली आहेया कार्यबदल त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## ज्ञानेश्वर विद्यालयाच्या यशाची परंपरा कायम; सेमी-इंग्रजी विभागाचा निकाल १०० टक्के




**छत्रपती संभाजीनगर (बेगमपुरा) :** येथील बेगमपुरा परिसरातील ज्ञानेश्वर विद्यालय येथील राज्य बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, त्यात विद्यालयाने यंदाही आपल्या देदीप्यमान यशाची परंपरा कायम राखली आहे. विशेष म्हणजे विद्यालयाच्या सेमी-इंग्रजी (Semi-English) वर्गाचा निकाल १०० टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेत आपली मोहोर उमटवली आहे. या यशाबद्दल विद्यालयात गुणवंत विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचा विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.यशाचे शिलेदार:विद्यालयाचा निकाल उत्कृष्ट लागला असून, प्रथम तीन क्रमांक पटकावणारे विद्यार्थी खालीलप्रमाणे आहेत:१. प्रथम क्रमांक: प्रीती गुडेकर (९०.४०%)२. द्वितीय क्रमांक: आदर्श सोनोने (८७.६०%)३. तृतीय क्रमांक: अमरीन बेगम (८३.६०%)कै.पंढरीनाथ पाटील शिसोदे उर्फ भाऊ सभागृहात या दिमाखदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. एस एस सी परीक्षा मार्च 2026 परीक्षेत विद्यालयाचा एकूण निकाल ८०.७३ टक्के लागला असून, त्याबाबत शैक्षणिक वर्तुळात समाधान व्यक्त केले जात आहे.पालकांचा सन्मान आणि मुख्याध्यापकांचे मार्गदर्शन :विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांच्या हस्ते सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. मोरे म्हणाल्या, "सेमी-इंग्रजी विभागाचा १०० टक्के निकाल हा शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांच्या एकत्रित परिश्रमाचे फळ आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी केवळ गुणांकडे न पाहता ज्ञानाची सांगड घालावी." पाल्याच्या यशात पालकांचा त्याग आणि पाठिंबा मोलाचा असल्याचेही त्यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.मान्यवरांची उपस्थिती:या सोहळ्याला विद्यालयाचे पर्यवेक्षक संभाजी तांगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी सर्व गुणवंतांचे अभिनंदन करत त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी रामेश्वर कोठुळे, भारत जोडपे, नाझेरा पठाण आणि आरती बिरोटे यांनी विशेष परिश्रम घेतले.परिसरातून कौतुकाचा वर्षाव: सेमी-इंग्रजी माध्यमाच्या १०० टक्के निकालामुळे आणि विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशामुळे बेगमपुरा परिसरात आनंदाचे वातावरण आहे. शाळेने जपलेली ही शैक्षणिक गुणवत्ता पाहून पालक वर्गातून समाधान व्यक्त होत असून, यशस्वी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

**Sanitary Health Inspector**

**सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर**

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १२ मे २०२६

## इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, मोहाडी येथील दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न




**जळगाव :** जिल्ह्यातील मोहाडी येथील इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजने दहावी आणि बारावीच्या परीक्षेत देदीप्यमान यश संपादन केले असून, या यशाबद्दल संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. यावर्षी शासनाकडून 'इन कॅमेरा' देखरेखीखाली अत्यंत कडक शिस्तीत परीक्षा घेण्यात आल्या होत्या, मात्र अशा आव्हानात्मक वातावरणातही शाळेने आपले शैक्षणिक वर्चस्व सिद्ध करत दहावीत ९८.४१% आणि बारावीत ९७.६१% असा घवघवीत निकाल नोंदवला आहे. याप्रसंगी इकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. अब्दुल करीम सालार, एजाज मलिक, अमीन बादलीवाला, अब्दुल अजीज सालार आणि रमीज बादलीवाला या मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. डॉ. सालार यांनी आपल्या मार्गदर्शनात शाळा आणि महाविद्यालयाच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्राचार्य व सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. शासनाच्या कडक परीक्षा पद्धतीचे स्वागत करताना त्यांनी नमूद केले की, अशा शिस्तबद्ध पॅटर्नमुळेच शिक्षण संस्थांच्या गुणवत्तेत खऱ्या अर्थाने सुधारणा होईल.

तसेच, मेहनती मुले ही कोळशाच्या खाणीतील हिऱ्यासारखी असून, शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे ते पैलूदार हिरे बनून भविष्यात समाज आणि देशाची निःस्वार्थ सेवा करतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## इस्त्राईल चे वाणिज्य दूत यानिव रेव्हाच यांचे गौरव उद्धगार



**दौलताबाद (जावेद अहमद) :** "धन्यवाद देतो की आपण आम्हाला अप्रितम किल्ला पाहण्याची व त्याबद्दल जाणून घेण्याची संधी दिली"यानिव रेव्हाच हे आज दि ११ सोमवारी सकाळी येथे भेट दिली त्यांनी कैलास मंदिर १६ नंबर, विश्वकर्मा १० नंबर, बौद्ध लेणी १२ नंबर, इंद्रसभा, जगणाथ सभा,आणि जैन लेणी ला भेट दिली व त्यानंतर घृष्णेश्वर बारावे जोतिर्लिंग येथे सोहळे धारण करून पंचामृत अभिषेक केला व त्यानंतर त्यांनी दौलताबाद किल्ला वर भेट दिली भारतमाता मंदिर, चांदमीनार, काळकोट, चिनीमहल, रंगमहाल, मेंढा तोप, अंधारी येथे भेट दिली त्यांना भरत जोशी यांनी मार्गदर्शन (गाईड) केले. त्यानी किल्ल्यातील भेट पुस्तकात किल्ला खूपच सुंदर व अभेद्य असल्याचे नमूद केले आहे. यावेळी संरक्षक सहायक संजय रोहनकर, पोलीस निरीक्षक रेखा लोंढे, उपनिरीक्षक आयुब पठाण, बापू डोंबळे, सहायक पोलिस उपनिरीक्षक रफिक पठाण, पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर कोळी, खुशाल पाटील, महेश घुगे, शरद बचाव, व एस नीळ, योगेश जाधव, बाबासाहेब आढाव आदींची उपस्थिती होती.

## भारत आसाराम दराडे मिटमिटा छत्रपती संभाजीनगर (पशुपक्षी मित्र ने सन्मानित )



**दौलताबाद (जावेद अहमद) :** मातोश्री समृद्धी प्रतिष्ठान व जे बी शेट संचिलत संस्थेच्या वतीने राजकीय, सामाजिक, महिला सबलीकरण, शैक्षणिक अश्या अनेक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या लोकांना अकरा वर्षापासून पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे रविवारी मौलाना आझाद रिसर्च सेंटर येथे माजी न्यायधीश दर्शनसिंग बेदी व सिटी चौक पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आलेयावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जयराम भोईर, मकसूद अन्सारी, सलीम चिस्ती,हाफिज अली, शकील शेख,पत्रकार जावेद शेख, मुख्य संपादक हसन अली,हनिफ शेख आदींची उपस्थिती होती. आपल्या स्वखर्चाने घरासमोर व घराच्या गच्चीवर चिमण्यासाठी घरटे बांधून त्यांच्या साठी दररोज धान्य व पाण्याची व्यवस्था केली आहे दररोज शेकडो चिमण्या येथे दानापाणी साठी येतात तर काही घरट्यात राहतातततसेच मीटमिटा ऊर्जा भूमी जटवाडा डोंगरावर मोठ्या प्रमाणात हरीण, ससे, अस्वले, रान डुकरं, उदबीले, रानमांजर, खोकड आणि जटवाडा, मिटमिटा, जोगवाडा येथील अनेक गायी,म्हशी, बकऱ्या चरण्यासाठी येतात पण त्यांना कुठेही पिण्यासाठी पाणी नाही ही परिस्थिति भारत दराडे यांनी पाहून स्वतःच्या खर्च ने जवळपास ३० पाणवठे व सिमेंट चे हौद तयार करून ठेवले आहे त्यात ते आठवड्यात दोन टँकर पाणी आणून टाकतात व चिमण्या साठी झाडावर प्लॅस्टिक चे टोपले अनेक ठिकाणी ठेवले आहे त्यात पाणी व धान्य टाकतातया कामासाठी त्यांच्या त्यांच्या पत्नी, दोन मुले व एक मुलगी देखील मदत करतातदराडे कुटुंबाला निस्वार्थ सेवेला सलाम आहे.






# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १२ मे २०२६


## मिडिया की भाडवेगिरीचा बाजार

आजचा मिडिया विकला गेला,
सत्तेच्या दारी झुकला गेला.
सत्याचा गळा दाबून टाकून,
खोट्याचा बाजार मांडला गेला.

पूर्वी लेखणी अंगार होती,
आता ती दलालीची तलवार झाली.
जनतेच्या अश्रूंवर जगणारी,
TRPची भुकेली बाजारू भाकर झाली.

शेतकरी मरतो... बातमी दोन मिनिटांची,
नट-नटी शिंकले तर रात्रभर चर्चा चालते.
गरीबाच्या घरात अंधार कायम,
पण स्टुडिओत दिव्यांची जत्रा पेटते.

ज्यांनी सत्तेला प्रश्न विचारायचे,
तेच आता चापलुसी करत बसले.
मालकांच्या इशाऱ्यावर नाचताना,
पत्रकारितेचे कपडेच उतरवून टाकले.

“ब्रेकिंग न्यूज”च्या नावाखाली
भीती विकली जाते रोज.
खोटं इतकं ओरडून सांगतात,
की सत्यच पडतं गप्प, बेजार, ओझं होऊन रोज.

हा मिडिया नाही आता,
तर रंगीत तमाशा झाला.
जनतेच्या दुःखावर जाहिराती घेणारा,
निर्लज्ज बाजार झाला.

काही अजूनही जिवंत आहेत,
ज्यांच्या रक्तात प्रामाणिकपणा धडधडतो.
पण त्यांचा आवाज दाबण्यासाठी
संपूर्ण सिस्टीमच पुढे सरसावतो.

आज मिडिया प्रामाणिक नाही,
कारण सत्याला किंमत नाही.
इथे विकले जातात आवाज, विचार, माणसं...
नोटांची भूक कधी संपत नाही.



**डॉ. बाळासाहेब लिहिणार**

## संपू दे अंधार सारा!

संपू दे अंधार सारा!
बळी राजाच्या जीवनी.
करू आपण प्रार्थना,
बा विठ्ठलाच्या चरणी. १

राब राब राबतो रे,
बाप माझा रे मातीत.
अहोरात्र रे झटतो,
घाम गाळीत शेतीत. २

रात्र दिन करी काम,
जीवनाच्या रणांगणी.
करी संघर्ष रे सदा,
भूमातेच्या रे प्रांगणी. ३

सुखी व्हावा बळीराजा,
हीच मंगल कामना.
करू रे सर्व प्रार्थना,
करू चला आराधना. ४

संपू दे अंधार सारा!
हर्ष मिळू दे जीवनी,
पिकू दे शेतात पीक,
देतो तुला रे पर्वणी. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## स्वप्नातल्या दुनियेत

स्वप्नातल्या दुनियेत
सारी नवलाई
तृप्त होतात डोळे
विचारू नका काही

स्वप्नातल्या दुनियेत
सुंदर परीराणी
उंच आकाशी उडतांना
गाते मधूर गाणी

स्वप्नातल्या दुनियेत
चांदोबाची शाळा
एक एक चांदण्या
शाळेत होतात गोळा

स्वप्नातल्या दुनियेत
देवबाप्पाचे भव्य वाडे
सोनेरी रथाला शोभे
पांढरे शुभ्र घोडे

स्वप्नातल्या दुनियेत
सुगंधी पाण्याचे तळे
कितीही पोहले तरी
कुणालाच नाही कळे



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो. ९०११५५९१०६






## सावरगाव तांड्यात शेतातील आखाड्याला भीषण आग; दीड लाखांचे नुकसान



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील सावरगाव तांडा येथील गट क्रमांक 127 मधील महिला शेतकरी संगीता संजय राठोड यांच्या शेतातील आखाड्याला सोमवारी दुपारी अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत तीन स्प्रिंकलर सेट पूर्णपणे जळून खाक झाले असून आंबा व नारळाची काही झाडेदेखील आगीत भस्मसात झाली आहेत. या घटनेत जवळपास दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केल्याने शेतातील साहित्य व झाडांचे मोठे नुकसान झाले. नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.

या घटनेमुळे महिला शेतकरी संगीता राठोड यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून परिसरातील नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे. शासनाने पंचनामा करून तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी संगीता राठोड यांनी केली आहे.



दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १२ मे २०२६

# आजच्या गावखेड्याचे वास्तव मांडणारी कथा : रानरांगुळ




**म**राठवाड्याच्या मायमातीचा गंध घेऊन मराठवाडी बोलीशैलीचा रांगडा बाज आहेच पण ती लय ढब ही आमची मराठवाडी बोली शैली दिमाखदार आहे.कवी कथाकार बालसाहित्यिक डॉ विठ्ठल जाधव यांच्या 'रानरांगुळ'या कथासंग्रह वाचला.आजच्या समकालीन वास्तवाचे अत्यंत भेसूर चित्रण आले ही नंगाट अन् पंगाट होऊन झिंगाट मडरं करणारी ही हैवान माणसं माय मातीचंवावरा शेताचं बर्बादीकरण करतं निघाली आहे.हीमाणसंच आहेत का? इतका कपटी आणि दुटप्पीपणा माणसात आला आहे.माय मातीने कधी बेईमानी केली नाही.पण ही पांढऱ्या पायाची ओवल्याद थोडीफार शिकली अन् शहराचं बिस्लरीचं पाणी पिवून पांढरपेशी झाली.रानाची राखरांगोळी करायला निघाली आहे.नाही राख रांगोळीचं झाली आहे.आमच्या गावखेड्यातील लोकं शहराळली आहे.जशी पिसाळी तशीच ही चवताळली.इथं
मायबाप,वडीलधारी,म्हतारेकोतारे काहीचं समजाना.नात्यागोत्याची नाळ तेव्हाच तुटली.आदरचा फादर केला अन् मायीचा मदर केला.मम्मीचा पदर जाळीत गेला.अगदी समकालीन आपल्या गावखेड्यात आज अत्यंत कोरडे दुःख जळताना दिसते आहे.विठ्ठल जाधव सर मराठवाडी बोलीशैलीचा अनुबंध म्हणजे ही दमदार अभिव्यक्तीची समर्थ लघुकथा आहे.आज तुमचे आमचे गावखेडे खवडे होऊन सुधारले आहे.गावागावात पांढरे बगळे आले अन् आमच्याच म्हशीच्या पाठीवर(पारावर)बसून आमच्याच भावकीची टवकी फोडू लागले.अस्सल मराठवाड्याची आजची 'लाईफस्टाईल' बोली हा या कथेचा आत्मा आहे.आमचे सारेच नी सगळेच स्टार्टर,वायर मोटर ते बुलडोझर म्हणजे आमचे 'सनगचं'बदले.रुम्हणं यठण,कोरडा, चापटनं,वसणं हे सारे गेले.नवं आलं अन् रघत पारखं झालं.विठ्ठल जाधव सरांच्या कथेचा आवाका अत्यंत समर्थ आहे.त्यात आजचे ज्वलंत प्रश्न जगणं आणि सामाजिक वास्तव मांडणारी ही कथा आहे.आज साऱ्याच गावच्या पांदणवाटा गेल्या आणि काळ्या सडका आल्या तशा गावागनिक 'काळ्या पिवळ्या'झाल्या.वावर बँकेकडे गहाण ठेवून 'काळी पिवळी'चा प्रवासी वाहतूक धंदा करावा.पण इथेही स्पर्धा, हाणामाऱ्या,नंबरसाठी दलाल,कर्ज हाप्ते भरले नाही म्हणून गाडी ओढून नेण्याची धमकी खाजगी सावकाराकडून कर्ज काढू तो तगादा वेगळाच.ही आजच्या वर्तमानाची अस्वस्थ करणारी कथा.आजच्या तरुणाची होरपळ या कथेतून येते.आज शेतीमातीची किंमत राहिली नाही.शेवटी शेती गहाण पडते.'कालीपिली'बँकवाले ओढून नेतात.कथेचा तरुण नायक बापाला दुःख दिले म्हणून अंथरूण धरतो.बेरोजगारांची ससे होलपट वाढत जाणारे वय शिक्षणात बरेचं वर्ष वाया गेलेली ह्या पदव्या मिळून ही नोकरी नाही.अनेक परिक्षा देऊन ही अपयश.सरकारी नोकरी मिळावी म्हणून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग लावले.शेवटी निराशा वाट्याला आली.हीचकुमारी निराशा जेव्हा लग्न झालं पाहिजे वय वाढत आहे.शेतकरी, कुणबीक करणारा मुलगा नकोय.बिझनेस करणारा कंपनीत नोकर आणि शहरात राहणारा,शहरातघर करुन राहणारा.'जगराहाटी' या कथेत असाचा एक तरुण नायक शहरात गाळा घेऊन दुकानदार होतो.सोयरे धायरे त्या सुशिक्षित उच्च विभूषित तरुणाला मुलगी देतात लग्न होते त्याच दिवशी गाळ्यातलं सामान हा मॅट्यडोअर भरुन घरी आणतो.कारण गाळ्याचा किराया थकल्यामुळे त्याला भाड्याचं खाली कर.खोट नाट सांगून लग्न करून घेयचं.लेकरू झटक्यानं होऊ द्यायचं.भांडणं तंडतं जगणं कोर्टकचेऱ्या करायच्या अशी आजच्या काळातील तरुणाईची मानसिकता झाली आहे.यालाचं उपटसुंभी 'जगराहटी'म्हणजे दंडामुडपी हाणामारी, हमरीतुमरी हीप्रचंड वेदनेचं मोहळ घेऊन ही कथा येते.खरं सांगून ही लोकं बेईमानी करतात.इमाणदारीच्या पोटात सुरा खुपसतात.बेइमानीचा कोयता घेऊन फिरतात.शिकला शिकला तितकाच हुकला.दावणीचा बईल खुट्याला मुकला.अशी कथेची वास्तविक दास्तान घेऊन ही कथा येते.'पत्तरवाळी'दुसऱ्याच्या ताटातल बेईमानीन हिसकून घेणं.'तात्याच्या सक्या पोराच्या नावावर गुंठाबी राहिला नाही'एजंट लोकांच्या नावावर खरडून गेली.लिहुन दिली.जमीन गेली.संजुच दुकान चालूच व्हतं.तात्याच्या पोराला संजू सांभाळीत व्हता.',(पृ.१५)जळीत,ऊस शेतकऱ्यांची व्यथा वेदनांवर भाष्य करणारी कथा.चिमुककाटा,एक जगू सेठ त्यांनी गावाला सुई दाभण पोरं सारं पुरवलं.तो गेल्यावर कुणीच त्यांची आठवण काढीत नाही हा चिमुककाटा मनात सलत राहतो.डांगरवाडा,या कथेत गाडीभरू डांगर मोंढ्यात घेऊन जातो पण बाराशे रूपये भाव येतो.इथ गाडीभाडं ही निघतं नाही.ही आजच्या वर्तमानाची अस्वस्थ करणारी शेतीच्या कष्टाची शिदोरी ही शेंदुरी कशी झाली आहे.हा आतबट्याचा व्यवहार झाला आहे.'गुळणागुळणी', मह्या मनात कवाचं नसतं.आताबी नाही.अन कशाचंच नसतं.तात्या म्हातारीला भेटायला चाल्ला व्हता.मनातली गुळणी मनात ठिवायची नसते.अशी ही कथा एक अनामिक ओढ देऊन जाते.हंटरकाठी,या कथेत अत्यंत खरं वास्तव पुढं आलं आहे.शहरात कशी दमकोंडी होते.'पोरं सोडून गेले.तिकड गेलेतर जमतं नाही.आम्ही असे गावं खेड्यातले.नातू मांडीवर खेळायचे दिवस आमचे.आमचे संस्कार शिदोरी नकोय त्यांना.इंथ म्हशींची बांध सोडं जीव रमतो'(पृ.४३)या आजच्या म्हातारपणाच्या व्यथा सांगणारी कथा काळजाचा ठाव घेते.म्हैस विकणे आहे!कोरोना काळ, मोबाईल,जाहिराती अन् चालवादी माणसं.मुकं जनावरं दावणीला..मी नाही जाणार.तंदूर रोटी, पोटापाण्यासाठी वाटेल ते करावं लागतं,आज जसं ढाब्याचं पेव फुटलं आहे.'वेटर मिस्तरी म्हणून घेतेनं' गोपाजी तंदुररोटी वाला मिस्त्री होतो.साखळदंड,'समाजनीतीचा साखळदंड नव्या पिढीच्या पायात बांधलेला व्हता.तो तोडता येणे अशक्य होता.(पृ.६०)लगीनसराई, साध्या गोष्टीवरून हानमाऱ्या.मानपान ते आज प्रखर चालू आहे.ऐनवेळेवर बहुल्यावर दुसरा नवरदेव उभा करून लग्न लावल्या जाते.ही खदखद या कथेतून येते.लळा,ही डमाळे मास्तर व महादुची कथा.महादूला शाळेचा आणि सरचा लळा लागतो.सरची बदली होते.याकथेच सादरीकरण जाधव सर करतात तेव्हा डोळे डबडबून येतात.जेष्ठ कार्यकर्ता,नेत्यासाठी मार खाल्ला, मोर्चे काढले.नेताचं दुसऱ्या पक्षात गेला.खरा कार्यकर्ता खुडूक झाला.बन्शीचा बाप मेला.नेता हडवाईत आला भाषण ठोकलं निघून गेला.बन्शी मोलमजुरी करू लागला.आज बंद काचाच्या गाड्या त्याच्या दारातून जातात.ही सखेद वेदना या कथेतून येते.राखरांगुळ, भुर्रमुट्या,उपट्या भुईमूग पेरला.पण रानडुक्करानं धुमाकूळ घातला.डुकरं उकरून शेंगदाणे खाऊ लागली.याच्यावर उपाय म्हणजे बांधाबंधुऱ्यावर केसाचे बुचके टाकायचे डुकरं नाकात केस गेलेकी ठसका लागून पळून जायचे.हे कथासुत्र अतिशय वास्तव मांडणारे आहे.एवढे करून ही उतारा कमीच येतो.कथा नायकाच्या बायकोला दिवस जातात तिच्या उलट्या थांबत नाही..हा सारा उतारा दवाखान्यात घालावा लागतो.अशा आशया संपन्न सृजन बीजाअंकुराच्या कथा मनाला मायाळूपणाचा पाझर फोडतात.आजचे वास्तव मर्म उलगडत जाते.भाषाशैली आणि कथन व कथासुत्र अतिशय दमदार आहे.ख्यातनाम कवी कथाकार नाटककार डॉ जगदिश कदम सर लिहितात "ही कथा जागतिकीकरणानं उध्वस्त केलेल्या शेतकरी समाजाचं दुखणं नेकीने मांडते.या समाजाला उद्योग,व्यापाराची गणित कशी गरगरत ठेवतात.यावर ही कथा मार्मिक भाष्य करते.नेमकेपणा हा या कथेचा अंगभूत विशेष आहे.अत्यंत प्रवाही भाषा आणि छोट्यांची परंतु भेदक घटना, प्रसंग यामुळे ही कथा आपली पृथकात्मता उमटविते.बोलीभाषेच्या अचूक उपयोजनामुळे कथा वाचनीय ठरते.कथाप्रांतात मौलिक भर घालणाऱ्या या कथा आहेत'(पाठराखण) आपल्या सृजनशील भावनेचंमनोगत डॉ विठ्ठल जाधव सर देतात 'गाव स्वयंपूर्ण व्हावे असे वाटत असताना वीज, आरोग्य, शिक्षण,निवारा,शेतशिवाराचे प्रश्न निर्माण झाले आहेत.एखादा तरुण नेट सेट, पीएच.डी असे उच्च शिक्षणात आयुष्य खर्ची घातलेला तरुण सीएचबी सारख्या धोरणाचा बळी ठरतो.उसतोडीसाठी जाणाऱ्या लोंढ्यांची बालके समाजातील उपेक्षित वंचित वर्गात ढकलले जातात.ही वस्तूस्थिती मांडण्याचा प्रयत्न केला आहे.(मनोगत)रानरांगुळ ही अतिशय संवेदनशील कथानुबंधाची गोष्ट आहे.सरदार जाधव यांचे मुखपृष्ठ आशय संपन्न रानभैरी मनमुक्त झाले आहे.आजच्या ग्रामीण वास्तवाचे साक्षात ठणक म्हणजे 'रानरांगुळ'.मनस्वी हार्दिक शुभेच्छा

**पुस्तक:-रानरांगुळ (कथासंग्रह)**
**कथाकार:- डॉ विठ्ठल जाधव**
**प्रकाशक:-स्टोरीमिरर इन्फोटेक प्राइवेट लिमिटेड, मुंबई**
**प्रथमावृती:-२जुन २०२४**
**मुखपृष्ठ:-सरदार जाधव**
**किंमत:-२१०/रुपये**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके,जालना**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002